सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/५८२ दि. ०९/०१/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्थाशी,
संलग्नित सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० अंतर्गत राज्यात इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'स्कुल कनेक्ट' हे संपर्क अभियान राबविणेबाबत**

महोदय,

राज्यात महाविद्यालयातील स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्याच्या अनुषंगाने आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतूदीविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी इयत्ता १२वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'स्कुल कनेक्ट' हे संपर्क अभियान विद्यापीठाच्या परिक्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या अभियानाअंतर्गत राज्यातील शासकीय, अनुदानित, विना अनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळा व कनिष्ठ विद्यालयातील इयत्ता १२ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार होणारे बदल, विद्यापीठाने तयार केलेला बहुशाखीय लवचिक अभ्यासक्रम व उच्च शिक्षणातील महत्त्वपूर्ण योजना या सर्व विषयांची माहिती 'स्कुल कनेक्ट' या अभियानामार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात येणार आहे. हे संपर्क अभियान दि. १५ ते ३१ जानेवारी २०२४ दरम्यान राबविण्यात येणार आहे.

सदर अभियानासाठी आपल्या महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्याकरिता योग्य ते सहकार्य व व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात यावेत आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १० फेब्रुवारी २०२४ पर्यंत शासनास सादर करावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय(विस्तार), मंत्रालय, मुंबई

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ४१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

E-mail id: sd4.sesd-mh@gov.in दुरध्वनी क्र. २२०२४७४५

---

क्रमांक :- संकीर्ण-२०२४/प्र.क्र. १३/एस.डी.४ दिनांक: ०८ जानेवारी, २०२४

**तात्काळ**

**प्रति,**

**आयुक्त (शिक्षण),**
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**विषय:- राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० अंतर्गत राज्यात इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'स्कुल कनेक्ट' हे संपर्क अभियान राबविणेबाबत.**

**संदर्भ:-** उच्च व तंत्र विभागाचे दिनांक ०५.०१.२०२४ रोजीचे शासन निर्णय.

**महोदय,**

संदर्भीय शासन निर्णयानूसार राज्यात महाविद्यालयातील स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्याच्या अनुषंगाने आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतूदीविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'स्कुल कनेक्ट' हे संपर्क अभियान विद्यापीठामार्फत, त्यांच्या परिक्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या अभियानाअंतर्गत राज्यातील शासकीय, अनुदानित, विना अनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळा व कनिष्ठ विद्यालयातील इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार होणारे बदल, विद्यापीठाने तयार केलेला बहुशाखीय लवचिक अभ्यासक्रम व उच्च शिक्षणातील महत्त्वपूर्ण योजना या सर्व विषयांची माहिती 'स्कुल कनेक्ट' या अभियानामार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात येणार आहे. हे संपर्क अभियान १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२४ या दरम्यान राबविण्यात येणार आहे.

सदर अभियान राबविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागास यथायोग्य सहकार्य होणे अपेक्षित आहे. तरी, या संपर्क अभियानासाठी प्रत्येक कनिष्ठ विद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यासाठी यथायोग्य व्यवस्था करण्याचे निर्देश द्यावेत. उपरोक्त अभियान राज्यातील सर्व शाळांमध्ये राबविण्यासाठी व लाभार्थी विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्यासाठी मदत करावी. सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक ०५.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय जोडला आहे. याविषयी आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १० फेब्रुवारी,२०२४ पर्यंत शासनास सादर करावा, ही विनंती.

आपली,

**(मृणाली काटेंगे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

सहपत्र- वरीलप्रमाणे